
ISSN : 2278-5914




सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा

# SANSHODHAN

Peer Reviewed Research Journal

Issue - XIII

# संशोधन

अंक तेरावा

Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara
(Inst.Reg No.Maharashtra/13482/Satara/2010)
Email ID: sisms2010@gmail.com

# SANSHODHAN

## PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

ISSUE - XIII
October 2022

• EDITORIAL BOARD •
Dr. Mrs. Urmila Kshirsagar
Dr. Suresh Chavan
Dr. Ajitkumar Jadhav
Dr. Gitanjali Borade
Dr. Sanjeev Bodkhe
Dr. Jaypal Sawant

2022

| अ. क्र. | संशोधकाचे नाव | शोधनिबंधाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १५. | Mr. Kakade Bhimarao Hariba | Social Status of Indian Woman in Gandhian Era and Role of Gandhi | 130 |
| १६. | प्रा.डॉ.संघमित्रा विठ्ठलराव सरवदे | स्वातंत्र्याचा इतिहास, पाळणा गीतातून स्त्रियांची अभिव्यक्ती | १३६ |
| १७. | सौ.जयवंती मधूकर अडलीकर | भारतीय स्वातंत्र्यलढयात महाराष्ट्रातील अवंतिकाबाई यांचे योगदान | १४१ |
| १८. | सौ.सविता सिताराम वेलदोडे | महीला स्वातंत्र्यसैनिकांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान | १४८ |
| १९. | प्रा.डॉ.सीमा नवनाथ इंदलकर | भारतीय स्वातंत्र्यलढ्यात वैयक्तिक सत्याग्रह करणाऱ्या महिला सत्याग्रही | १५२ |
| २०. | श्री.महेश वसंत कुलकर्णी | महिला स्वातंत्र्य सैनिकांचे भारतीय स्वातंत्र्यलढयातील योगदान | १५७ |
| २१. | प्रा.डॉ.प्रसाद सुरेश भागवत | गोपाळ कृष्ण गोखले राष्ट्रीय चळवळीतील एक उदारमतवादी विचारवंत | १६१ |
| २२. | प्रा.डॉ.दत्तात्रय पांडुरंग खराडे | गाँधी और असहयोग आंदोलन | १६८ |
| २३. | प्रा.डॉ.संजय हणमंत भोसले | उषा मेहता यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | १७४ |
| २४. | प्रा.डॉ.सुरेश विठ्ठलरावपाथरकर प्रा.डॉ.अंकुश मारुती सोहनी | भारतीय स्वातंत्र्य लढयातील डॉ.ॲनी बेंझटचे ऐतिहासिक कार्य | १८० |
| २५. | Dr. Barolia Sanjay Yadav Monalee | Forgotten Stars of Indian Freedom Struggle from Panna District | 188 |
| २६. | प्रा.डॉ.प्रेमचंद गुंडू गायकवाड | भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील शेतकरी आणि कामगारांचे योगदान : एक ऐतिहासिक अवलोकन | १९५ |
| २७. | प्रा.डॉ.चंद्रकांत बाबुराव कुंभार | सातारा जिल्हयातील स्वातंत्र्यलढे | २०३ |
| २८. | प्रा.डॉ.सौ.मंजिरी म. कुलकर्णी | अक्कलकोट संस्थानातील स्वातंत्र्यसैनिकांचे कार्य | २१२ |
| २९. | प्रा.डॉ.केत अंबादास धर्मा | १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीतील सोलापूर जिल्हयातील व्यापारी वर्गाचा सहभाग | २१७ |

# स्वातंत्र्याचा इतिहास, पाळणागीतातून स्त्रियांची अभिव्यक्ती

डॉ.संघमित्रा विठ्ठलराव सरवदे
मा.श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
हातकणंगले जि. कोल्हापूर

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात परंपरेने चालत आलेल्या बाबी अस्तंगत होत आहेत. मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण, यांत्रिकीकरण आणि शहरीकरण होत आहे. यामुळे जीवन शैली झपाट्याने बदलत असून परंपरेने चालत आलेल्या मौखिक परंपरांचा देखील ऱ्हास होत चालला आहे. स्त्रियांच्या जीवनातही मोठे परिवर्तन होत आहे. तिचा जगण्याचा पारंपारिक बाज काळानुरूप बदलत चालला आहे. आधुनिक यंत्र सामग्रीमुळे तिचे जीवन सुकर होत आहे.

पूर्वीच्या काळी आजच्या सारख्या सुख-सुविधा उपलब्ध नसत. बायकांना दळण-कांडण घरच्या घरी करावे लागत असे. त्या घरी जात्यावर दळण दळत असताना ओव्यांच्या माध्यमातून आपले सुख-दु:ख व्यक्त करत असत. आता यांत्रिक सेवा-सुविधा आल्याने जात्यावरील दळण गेले तशा जात्यावरील ओव्या मात्र अस्तंगत होऊ लागल्या. त्या काळच्या स्त्रीची जात्यावरील ही अभिव्यक्ती आता मात्र दिसत नाही. फक्त ओवीच नाही तर तिच्या जीवनामध्ये विविध प्रसंगी म्हणायची जी स्त्री-गीते होती त्याची परंपरा देखील अस्तंगत होत चालली आहे. हे स्त्री-गीते स्त्रियांच्या भाव-जीवनाच्या इतिहासाचे साधने आहेत. या ओव्यांच्या माध्यमातून या स्त्रिया अनेक विषयांना हात घालताना दिसतात. हे विषय कौटुंबिक जसे, भावा-बहिणीचे प्रेम, भावाबद्दलचा आदर-भाव, माहेरच्या विविध नात्यांतील जिव्हाळ्याशी जोडलेले प्रसंग, एवढेच नाही तर देशात त्या काळी घडणाऱ्या घटना, स्वातंत्र्य चळवळीशी व सामाजिक चळवळीशी निगडीत नेत्यांविषयीचा आदर भाव याचा देखील अंतर्भाव असे. या शिवाय हे विषय उखाणे, पाळणा गीतातून देखील व्यक्त होत असत.

स्त्रियांनी निर्माण केलेल्या मौखिक साहित्य प्रकारातील पाळणा गीतातून स्वातंत्र्या संबंधित अभिव्यक्तीचा शोध घेणे व त्या निमित्ताने अज्ञात स्त्रियांच्या स्वातंत्र्य चळवळीतील वेगळ्या प्रकारच्या योगदानावर प्रकाश टाकणे.

स्वातंत्र्याच्या चळवळीत सक्रिय भाग घेतलेल्या अनेक स्त्रियांची नावे सांगता येतील. या स्त्रिया प्रामुख्याने विशेषाधिकार प्राप्त असलेल्या वर्गातील असल्याचे दिसते. त्यांना जन्माधारित विशेषाधिकार, मिळालेल्या शिक्षणाच्या संधी, उपलब्ध असलेली कौटुंबिक व सांपत्तिक स्थिती व राजकीय पार्श्वभूमी या सर्व बाबींचा उपयोग स्त्रियांनी करून घेतला व स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी स्वत:ला झोकुन दिले यांची नावे इतिहासात नोंदली गेली. पण खेड्या-पाड्यातील ग्रामीण स्त्रियांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचे स्वरूप वेगळे असल्याने त्याकडे इतिहास अभ्यासकाचे लक्ष गेले नाही. कोणी अज्ञात स्त्रियांनी पाळणा गीतातून मौखिक स्वरुपात स्वातंत्र्या इतिहास गायला व तो अनेक स्त्रियांनी अनेक स्त्रियांपर्यंत पोहचविला. फक्त पाळणा गीतासारखी गीतेच नव्हे तर उखाणा या द्वारेही तिने स्वातंत्र्याच्या चळवळीची अभिव्यक्ती केली आहे.

प्रस्तुत संशोधनपर लेखात आपण असेच उखाणे व पाळणा गीतातून ज्या स्त्रिया स्वातंत्र्या संबंधाने अभिव्यक्त झाल्या आहेत त्याचा आढावा घेणार आहोत. उखाणे कोल्हापूर जिल्ह्याच्या हातकणंगले तालुक्यातील ग्रामीण भागातील स्त्रियांचे उखाणे व पाळणा गीत बीड जिल्ह्यातील सावळेश्वर-पैठण या गावातून प्राप्त झाले आहे. सावळेश्वर या गावातील सोजरबाई भालचंद्र पवार यांनी ते गाऊन दाखविले ते येथे शब्दबद्ध केले आहे.

**उखाणे :**

कोल्हापूर जिल्ह्याच्या हातकणंगले तालुक्यातील ग्रामीण भागातील स्त्रियांच्या मुलाखती घेऊन काही उखाण्यांचे संकलन केले आहे. या उखाणे प्रकारातून देशभक्तीपर अभिव्यक्ती अशी प्रकट झाली. उखाण्यांचे काही उदाहरणे अशी,

मी आहे साधी, वापरते खादी..... रावाचे नाव घेते सगळ्याच्या आधी[१] सहज आले बाहेर, नजर गेली आकाशात..... रावाचा फोटो भारताच्या नकाशात. [२] स्त्रियांनी निर्माण केलेल्या मौखिक साहित्याच्या अभ्यासातूनही त्यांच्या स्वातंत्र्या चळवळीच्या संबंधाने त्याच्या जाणिवांचा अभ्यास करता येईल.

इतिहास फक्त लिखित साधनामध्येच नसतो तर तो आपल्या वर्तमानात अंश रूपाने जिवंत असतो. तो रूढीमध्ये, प्रथांमध्ये, मिथकांमध्ये दडलेला असतो. तो आपल्या आजूबाजूचा परिसर यांच्यात सामावलेला असतो. पुराणे, लोकसाहित्य, स्थानिक देवता विषयक कथा यामध्येही असतो. दुसरे कोणतेही लिखित साधने जे मांडतात ते जसेच्या तसे मांडणे म्हणजे इतिहास नव्हे. साधने आपल्याला एक धागा दोरा देतात त्यांच्या अनुषंगाने संशोधकाला शोध घ्यावा लागतो. [३] पाळणा या स्त्री गीतात 'चले-जाव' चळवळीचा इतिहास त्यांनी मांडला आहे हा इतिहास आम्ही

जाणतो पण ज्या स्त्रियांनी तो मांडला त्यांच्या संदर्भाने या गीताकडे आपण पाहिले पाहिजे. या स्त्रियांना एकतर शिक्षण नाही, बाहेरच्या जगाची ओळख नाही. एकट्याने बाहेर पडण्याची सोय नाही. बाह्य जगाशी संपर्क नसल्याने त्या एक प्रकारचे बंदिस्त स्वरुपाचे जीवन जगत असतात. तसेच, रिती रिवाज, रूढी परंपरेचे व कुळाचाराचे पालन करणे एवढ्यापुरते स्त्रीचे विश्व मर्यादीत होते. पण या विश्वाला छेद देत त्या काळाच्या राजकीय घडामोडीची माहिती ठेवून ती माहिती पाळणा गीतातून गुंफून या गीताच्या माध्यमातून इतर स्त्रियांच्या पर्यंत ती माहिती पोहचवणे हे मोठे काम त्या काळातील अज्ञात स्त्रियांनी केले आहे. हे त्यांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीतील सहभागी होण्याचे एक आगळे माध्यम त्यांनी निर्माण केले होते असे म्हणता येईल.

**पाळणा गीते :**

गरोदर स्त्री बाळंत झाल्यानंतर जो आनंद होतो या आनंदालाही भारतीय स्त्रियांनी गीतबद्ध केले आहे. बाळाच्या बारशाच्या निमित्ताने केलेल्या विधीच्या वेळी पाळणा गीत म्हटले जाते.[४] या पाळणा गीतात भारतीय स्वातंत्र्याचे सोनेरी पान असलेल्या 'चले-जाव'च्या चळवळीची माहिती मिळते.

'पहिले नमन माझे गांधी बाबाला ।
दुसरे नमन माझे हिंद मातेला ।
तिसरे नमन माझे राष्ट्र झेंड्याला ।
मातेच्या पोटी हिरा जन्मला जो बाळा जो जो रे जो ।।१।।
अठरा ऑगस्ट बेचाळीस सालात झाला ठराव मुंबई शहरात
नाही कळले आम्हा खेड्यात, पुढारी सारे टाकले तुरुंगात जो बाळा जो जो रे जो
चले-जावचा ठराव झाला इंग्रजाने या डावच केला
अटक केली गांधी बाबाला त्या वेळेस क्रांती आली जन्माला
जो बाळा जो जो रे जो ।।२।।
पहिल्या दिवशी पहिला प्रकार तुरूंग केला हा चूर
इंग्रज सरकार केले जर्रजर्र बंदोबस्ताला गोरे लष्कर
जो बाळा जो जो रे जो
दुसऱ्या दिवशी दुसरा प्रकार ऑगस्ट क्रांती नेताजी थोर
जयप्रकाश धावले म्होरं, क्रांती करण्यास व्हावे तयार
जो बाळा जो जो रे जो
तिसऱ्या दिवशी तिसरा प्रकार क्रांतीवीर बोले अचितराव लहान थोरांनी सेनेत रहावे

क्रांती विरांना संगट न्यावे जो बाळा जो जो रे जो
चवथ्या दिवशी चौथा डाव राम मनोहर, लहु डॉक्टर रेडिओ वरून बोलती सारे
जो बाळा जो जो रे जो.
पाचव्या दिवशी पाचवी यावी क्रांती दिनाची पुजा करावी
साऱ्या देशात संतोष व्हावा जो बाळा जो जो रे जो
सहाव्या दिवशी सहावाच फेरा पुल तोड्नी तारा तोडल्या आगगाडी तुम्ही बंद कराया
गोरे साहेब येथीच धरा जो बाळा जो जो रे जो
सातव्या दिवशी सातवा धडा कोर्ट कचेऱ्यावर मोर्चे काढा कोर्ट ऑफिसेस बंदच करा
नोकरशहांनो नौकऱ्या सोडा जो बाळा जो जो रे जो.
नवव्या दिवशी नवरत्न हार नाना पाटील क्रांतीचा वीर संघ घेवूनी क्रांतीचे स्वार
असे स्थापन केले प्रतिसरकार जो बाळा जो जो रे जो
दहाव्या दिवशी दहावा गुण साने गुरूजी माते प्रमाणे राष्ट्र सेवक क्रांतीचे पान
जो बाळा जो जो रे जो
अकराव्या दिवशी अकरावा केला सुभाष बाबूनी मंत्र हा दिला
भारत-जन जय हिंद बोला एका जुटीने चला दिल्लीला जो बाळा जो जो रे जो
बाराव्या दिवशी बारावा रंग साऱ्या देशात वाजले शिंग
इंग्रजाचे राज्य केले भंग जो बाळा जो जो रे जो
क्रांती जन्मली मुंबई शहरात, झाला आनंद हिंदूस्थानात,
पाचवी पुंजली बेदर देशात पाळणा बांधिला सातार जिल्ह्यात जो बाळा जो जो रे जो
आई बापांनो विनंती ऐका राष्ट्रीय पाळणा येतोय जोपा
काणी बाळाच्या जयहिंद फुका तुकारामाची विनंती ऐका जो बाळा जो जो रे जो.'[५]

भारतीय परंपरा ही प्रामुख्याने मौखिक आहे. स्त्रियांना शिक्षण देण्यापासून वंचित ठेवले तरी जात्यावरच्या ओव्या, वेगवेगळ्या सणाला गायली जाणारी गाणी, म्हणी, वाक्प्रचार, लोककथा यामध्ये व्यक्त झालेले स्त्री-मनाचे पदर अलगद उलगडून पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.[६] या पाळणा गीतातूनही स्त्रियांच्या राजकीय जाणिवांचा आविष्कार पहावयास मिळतो. पण या जाणिवा स्त्रियांच्या खास स्त्री म्हणून असलेल्या भाव-विश्वात त्या व्यक्त झाल्याचे दिसून येते.

या पाळणा गीतातून त्या काळाच्या इंग्रजाविरूद्धच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचे संदर्भ येतात. पण या गीताचा अभ्यास एवढ्या पुरता मर्यादीत करता येत नाही तर त्या पुढे जाऊन स्त्रियांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत जे अनोख्या पद्धतीने योगदान दिले आहे

त्यावर भाष्य केल्याशिवाय त्या काळाच्या राजकीय चळवळीचा जोर व या चळवळीला गतीशील ठेवण्यासाठी म्हणून किंवा गती देण्यासाठी स्त्रियांच्या या गीताने नक्कीच मोठी कामगिरी केली असणार आहे. या संदर्भाने सोजरबाई पवार यांनी माहिती दिली. त्या म्हणतात, मी त्या काळात दहा बारा वर्षांची असेल. तालुक्यातून काही स्त्रिया आपल्या गावात येत व स्वातंत्र्याच्या चळवळीसंबंधी आम्हाला माहिती देत. त्यांनी आम्हाला हा पाळणा शिकविला. आम्ही हा पाळणा म्हणत असू. या गीतातून स्वातंत्र्यासंबंधी माहिती स्त्रियांना मिळत होती. एक नवे चैतन्य आमच्यामध्ये निर्माण झाले होते.[७] पण त्यांना त्यांच्या गावी आलेल्या या स्त्रिया कोण होत्या त्यांची नावे सांगता आली नाहीत.

## निष्कर्ष :

'चले-जाव' च्या चळवळीची त्या काळाच्या राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीची माहिती स्त्रियांपर्यंत पोहचते व ही माहिती त्या पाळणा या प्रकारच्या गीतातून गुंफून त्या इतर स्त्रियांपर्यंत पोहोचतात. ही गोष्ट आपणांस त्या काळाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीची व्यापकता व या चळवळीस सामान्य स्त्रियांकडून मिळणारा पाठिंबा दर्शवतात असे म्हणावे लागेल. सामान्य स्त्रियांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभागाची या स्त्री गीताच्या माध्यमातून नोंद नक्कीच घेता येते असे म्हणावे लागते.

## संदर्भ :


१) सौ. कांबळे सुनिता भरत, मजले ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांची मुलाखत दि. २०/२/२०१९.

२) सौ. कोठावळे कविता अशोक, मजले ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांची मुलाखत दि. २०/२/२०१९.

३) प्रा. बांबूरकर जास्वंदी, स्त्रीवादी इतिहास, (संपा. प्रा. जास्वंदी बांबूरकर, इतिहासातील नवे प्रवाह) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, २०१४, पृ. ८३.

४) मांडे प्रभाकर, मौखिक वाययाची परंपरा स्वरूप आणि भवितव्य, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०१०, पृ. १५३.

५) मुलाखत सोजराबाई भालचंद्र पोवार दि. १३.१०.२०२०.

६) प्रा. बांबूरकर जास्वंदी, स्त्रीवादी इतिहास, (संपा. प्रा. जास्वंदी बांबूरकर, इतिहासातील नवे प्रवाह) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, २०१४, पृ. ८५.

७) मुलाखत सोजराबाई भालचंद्र पोवार दि. १३.१०.२०२०.